फक्त भागधारकांकरितां

# दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि; माळीनगर

नोंदणीकृत कार्यालय:- माळीनगर, जि. सोलापूर

CIN : U15424PN1932PLC001904

## भागधारकांच्या असाधारण सभेची नोटीस

याद्वारे नोटीस देण्यात येते की, दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि; च्या भागधारकांची असाधारण सभा, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (VC) अदर ऑडीओ व्हीज्युअल मिन्स (OAVM) द्वारे बुधवार दि. ३ जून, २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता खालील कामकाजासाठी घेण्यात येत आहे.

**स्पेशल बिझीनेस-**

**१) आकस्मिक रिक्त जागा भरणेसाठी स्टॅट्युटरी ऑडीटर नेमणेबाबत.**

पुढे नमूद केलेला ठराव, साधारण ठराव म्हणून मंजूर करणेबाबत.

" ठरविण्यात येते की, कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३९ अन्वये व [ कंपनीज (ऑडीट आणि ऑडीटर्स) रूल्स २०१४ अन्वये ] (त्यातील वेळोवेळी अंमलात असलेल्या कोणत्याही वैधानिक सुधारणा व पुनर्रचनेसह) व इतर लागू असलेल्या तरतूदीनुसार मागील स्टॅट्युटरी ऑडीटर मे. शारपार्थ आणि कंपनी एलएलपी, चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे (FRN 132748 W) यांच्या राजीनाम्यामुळे निर्माण झालेली रिक्त जागा भरण्यासाठी मे. एल. एम. जोशी आणि कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस, पुणे (FRN 104403 W) यांची कंपनीचे स्टॅट्युटरी ऑडीटर म्हणून नेमणूक करण्यात यावी व येत आहे."

" पुढे ठरविण्यात येते की, मे. एल. एम. जोशी आणि कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस, पुणे हे या असाधारण सभेपासून येणाऱ्या वार्षिक साधारण सभा संपेपर्यंत कंपनीचे स्टॅट्युटरी ऑडीटर म्हणून कार्यरत राहतील आणि संचालक मंडळ त्यांच्याशी विचार विनिमय करून निश्चित केलेल्या मेहताऩ्यावर ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या कालावधीचे ते स्टॅट्युटरी ऑडीट करतील. "

" पुढे ठरविण्यात येते की, ह्या ठरावाच्या अनुषंगाने जी काही पूर्तता करणे आहे, ती पूर्तता करण्याचे व रिटर्न्स, फॉर्म्स दाखल करण्याचे अधिकार मा. संचालक मंडळास या ठरावान्वये देण्यात यावे व येत आहे."

**२) बॉरोईंग लिमीट रू. १६० कोटी करणेबाबत.**

पुढे नमूद ठराव, खास ठराव म्हणून मंजूर करणेबाबत.

" ठरविण्यात येते की, यापुर्वी मंजूर करण्यात आलेल्या ठरावाऐवजी कंपनी कायदा २०१३ च्या कलम ७७ आणि कलम १८० (१) (सी) नुसार आणि त्यास अनुसरून असलेल्या नियमांनुसार (ज्या त्या वेळी लागू असलेल्या त्यामधील वैधानिक सुधारणा अथवा पुर्नवैधानिकीकरण यासहीत) आणि मेमोरँडम आणि आर्टिकल्स ऑफ असोसिएशन तरतुदीस अधिन राहून कंपनीच्या संचालक मंडळाला कंपनीच्या कामकाजासाठी लागणारी रक्कम अथवा रकमा (नॉन फंड बेस्ड बँकींग फॅसिलिटीसह) भारत अथवा भारताबाहेर एक अथवा अनेक बँक अथवा बँका, वित्तिय संस्था आणि इतर व्यक्ती, संस्था, कॉर्पोरेट बॉडीज, राज्य व केंद्र सरकार यांचेकडून त्यांच्या अटी आणि शर्तीवर, तारण अथवा तारण विरहीत वेळोवेळी कर्जाऊ रक्कम अथवा रकमा घेण्यास या अन्वये संचालक मंडळास अधिकार देण्यात यावे व येत आहेत. तसेच कर्जाऊ घ्यावयाची रक्कम अथवा रकमा व तसेच यापुर्वी कंपनीने घेतलेली कर्जे व ते मिळून होणारी रक्कम (कंपनीच्या नेहमीच्या कामकाजाकरिता कंपनीने बँकांकडून तात्पुरत्या स्वरूपाची कर्जे घेतली असतील ती सोडून) कंपनीचे पुर्ण भरपाई झालेले भागभांडवल. फ्री रिझर्व्हज आणि सिक्युरिटीज प्रिमियमपेक्षा जास्त म्हणेजच रक्कम रूपये १६०,००,००,०००/- (रूपये एकशे साठ कोटी फक्त) पर्यंत कर्ज काढण्यास संचालक मंडळास याअन्वये मंजूरी देण्यात यावी व येत आहे."

" पुढे ठरविण्यात येते की, वर नमूद ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी संचालक मंडळास कर्जाऊ रक्कम उचल करण्या संदर्भात व इतर सर्व आवश्यक आणि योग्य वाटतील ती सर्व कामे आणि पुर्तता करण्यासाठी आणि आवश्यक असलेले सर्व दस्त आणि करार मदार इत्यादी करून देण्याचे अधिकार याअन्वये देण्यात यावे व येत आहेत."

**३) कंपनीच्या मालमत्तेवर चार्ज निर्माण करणेबाबत.**

पुढे नमूद ठराव, खास ठराव म्हणून मंजूर करणेबाबत.

" ठरविण्यात येते की, यापुर्वी मंजूर करण्यात आलेल्या ठरावाऐवजी कंपनी कायदा २०१३ च्या कलम १८० (१) (अ) नुसार आणि त्यास अनुसरून असलेल्या नियमांनुसार (ज्या त्या वेळी लागू असलेल्या त्यामधील वैधानिक सुधारणा अथवा पुर्नवैधानिकीकरण यासहीत) आणि आर्टिकल्स ऑफ असोसिएशनच्या तरतुदीस अधिन राहून कंपनीच्या संचालक मंडळास विदेशी मुद्रा किंवा भारतीय रूपयात घेण्यात येणारी कर्जे, डिबेंचर्स व कंपनी व लेंडर्स यांच्यामध्ये मान्य झालेल्या शर्ती व अटीस अधिन राहून कंपनीच्या सध्याच्या व भविष्यातील स्थावर अथवा जंगम मालमत्तेवर, मिळकतीवर याआधी असलेल्या तारण, गहाण, प्लेज, चार्जसह अजून तारण , गहाण, प्लेज अथवा चार्ज रक्कम रूपये १६०,००,००,०००/- (रूपये एकशे साठ कोटी फक्त) पर्यंत देण्यास संचालक मंडळास याअन्वये अधिकार व संमती देण्यात यावी व येत आहे."



Scanned with OKEN Scanner

" पुढे ठरविण्यात येते की, वर नमूद ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी संचालक मंडळाला कर्जाऊ रक्कम उचलण्यासाठी तारण, गहाण, चार्ज इत्यादी देण्यासाठी व इतर सर्व आवश्यक आणि योग्य वाटतील ती सर्व कामे आणि पुर्तता करण्यासाठी आणि आवश्यक असलेले सर्व दस्त आणि करार मदार इत्यादी करून देण्याचे अधिकार याअन्वये देण्यात यावे व येत आहेत."

**४) गॅरंटी देणेबाबत.**

पुढे नमूद ठराव, खास ठराव म्हणून मंजूर करणेबाबत.

" ठरविण्यात येते की, यापुर्वी मंजूर करण्यात आलेल्या ठरावाऐवजी कंपनी कायदा २०१३ च्या कलम १८६ (३) नुसार आणि नियमांनुसार (ज्या त्या वेळी लागू असलेल्या त्यामधील वैधानिक सुधारणा अथवा पुर्नवैधानिकीकरण यासहीत) आणि मेमोरॅंडम आणि आर्टिकल्स ऑफ असोसिएशनच्या तरतुदीस अधिन राहून कंपनीच्या संचालक मंडळास रक्कम रूपये १५,००,००,०००/- (रूपये पंधरा कोटी फक्त) पर्यंतच्या कर्जासाठी हमी देण्यासाठी व कंपनीने दिलेली हमी अथवा देण्यात येणाऱ्या एकूण हमीची रक्कम कंपनी कायदा २०१३ कलम १८६ (३) मध्ये नमूद केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त असेल तर ती देण्याचे अधिकार संचालक मंडळास याअन्वये देण्यात यावे व येत आहे."

" पुढे ठरविण्यात येते की, वर नमूद ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी संचालक मंडळास हमी देण्यासाठी व इतर सर्व आवश्यक आणि योग्य वाटतील ती सर्व कामे आणि पुर्तता करण्यासाठी आणि आवश्यक असलेले सर्व दस्त आणि करार मदार इत्यादी करून देण्याचे अधिकार याअन्वये देण्यात यावे व येत आहेत."

माळीनगर
७ मे २०२६

मा. संचालक मंडळाच्या आदेशानुसार
राजेंद्र गो. गिरमे
चेअरमन
(DIN: 00431247)
अकलूज-माळीनगर रोड, २१ चारी, माळीनगर
ता. माळशिरस, जि. सोलापूर ४१३१०८

---

टीप:

१. कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०२ नुसार खुलासेवार निवेदन सोबत जोडले आहे.

२. मिनिस्ट्री ऑफ कार्पोरेट अफेअर्सने ("MCA") त्यांच्या दि. ५ मे २०२०, ८ डिसेंबर २०२१, १४ डिसेंबर २०२१ तसेच मिनिस्ट्री ऑफ कार्पोरेट अफेअर्सच्या दि. ५ मे २०२२, २८ डिसेंबर २०२२, २५ सप्टेंबर २०२३ आणि १९ सप्टेंबर २०२४ व २२ सप्टेंबर २०२५ च्या (एकत्रितपणे "MCA" सर्क्युलर संदर्भित) सर्क्युलर नुसार कंपन्यांना पुढील आदेशापर्यंत त्यांच्या AGM/EGM सभा व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे (VC) अथवा अदर ऑडीओ व्हीज्युअल मिन्स (OAVM) ने, भागधारकांनी समक्ष हजर न राहता, घेण्यास परवानगी दिली आहे. वरील "MCA" सर्क्युलरनुसार आपल्या कंपनीची असाधारण सभा VC/OAVM द्वारे घेण्यात येत आहे. तसेच कंपनी कायदा कलम ९६ (२) च्या तरतुदीनुसार जरी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगने सभा घेण्यात येत असली तरी तांत्रिक दृष्ट्या मिटींगची जागा ही कंपनीचे रजिस्टर्ड ऑफिस राहील.

३. मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्सच्या सर्क्युलरचा विचार करता ज्या भागधारकांनी कंपनीकडे ई-मेल नोंदविलेला आहे, त्यांना ई-मेलने नोटीस पाठविण्यात येतील. तथापि फार कमी भागधारकांनी ई-मेल आयडी कंपनीकडे नोंदविलेले असल्याने व भागधारकांना नोटीस मिळावी या उद्देशाने भागधारकांना फिजिकल स्वरूपातही नोटीस पाठविण्यात येत आहेत. तसेच असाधारण सभेची नोटीस कंपनीची वेबसाईट http://www.saswadmalisugar.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. भागधारकांना नोटीसीसोबत EVSN व पासवर्ड पाठविण्यात येत आहे.

४. ज्या भागधारकास उपस्थित राहण्याचा व मत देण्याचा हक्क आहे त्यांना स्वत:ऐवजी आपला प्रतिनिधी (प्रॉक्झी) उपस्थित राहण्यासाठी व मत देण्यासाठी नेमण्याचा हक्क आहे. परंतु असाधारण सभा मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्सच्या सर्क्युलरनुसार VC/OAVM द्वारे घेण्यात येत असल्याने भागधारकांना समक्ष हजर राहता येणार नाही. त्यामुळे भागधारकांना प्रॉक्झी नेमण्याची सुविधा राहणार नाही. त्यामुळे प्रॉक्झी फॉर्म जोडला नाही.

५. असाधारण सभा व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे (VC)/अदर ऑडीओ व्हीज्युअल मिन्स (OAVM) ने आयोजित करण्यात आली आहे. भागधारक त्यांच्या लॅपटॉप/मोबाईल याद्वारे सदर सभेस हजर राहू शकतील. व्हीडीओ कॉन्फरन्सिंगने असाधारण सभेस हजर राहणाऱ्या भागधारकांनी नोटीसीत नमूद केलेल्या सूचनांचे पालन करावे. या सूचना सभेच्या नोटीसीसोबत जोडल्या आहेत.

६. कंपनीच्या भागधारकांचे रजिस्टर व ट्रान्स्फर रजिस्टर बुधवार दि. २७/५/२०२६ ते बुधवार दि. ३/६/२०२६ (दोन्ही दिवस धरून) अखेर बंद ठेवण्यात येतील.

७. असाधारण सभेच्या नोटीसीतील विषया संदर्भात ज्या भागधारकांना माहिती किंवा स्पष्टीकरण घ्यावयाचे आहे. त्यांनी मंगळवार दि. १९ मे २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत कंपनीच्या रजिस्टर्ड ऑफिसमध्ये पोहोचतील अशा बेताने आपले लेखी प्रश्न पाठवावेत अशी विनंती आहे.



Scanned with OKEN Scanner

८. भागधारकांच्या सोयीसाठी नोटीस आणि स्पष्टीकरणाचे मराठी भाषांतर उपलब्ध करुन देण्यात आले आहे. कोणतीही विसंगती किंवा तफावत आढळल्यास इंग्रजी आवृतीच अंतिम आणि अधिकृत मानली जाईल.

**इतर सूचना :-**

१. जे भागधारक मंगळवार दि. २६ मे २०२६ रोजी शेअर्स धारण करीत असतील त्यांना ते धारण करीत असलेल्या शेअर्सच्या प्रमाणात मतदान करता येईल. कंपनीच्या भागधारकांना इलेक्ट्रॉनिक पध्दतीने मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करुन द्यावी लागते. त्याप्रमाणे ती सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.
जे भागधारक रिमोट ई-व्होटींगने मतदान करणार नाहीत त्यांना असाधारण सभेच्या वेळी ई-व्होटींग करता येईल.

२. भागधारकांना रिमोट ई-मतदान पध्दतीने किंवा ई-मतदानाने मतदान करण्याची सुविधा देण्यात आली आहे. त्यांना एकाच पद्धतीचा अवलंब करता येईल. जर दोन्ही पध्दतीने आपले मतदान केल्यास रिमोट ई-मतदानाद्वारे केलेले मतदान ग्राह्य धरले जाईल.

३. व्होटींग प्रोसेसची योग्य व पारदर्शी पध्दतीने स्क्रुटीनी करण्यासाठी श्री. अमोल गुरनुले, कंपनी सेक्रेटरी, नागपूर यांची स्क्रुटिनायझर म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

४. असाधारण मिटींगमधील मतदान संपल्यानंतर स्क्रुटिनायझर असाधारण सभेमध्ये झालेल्या मतदानाची मत मोजणी करतील व झालेल्या मतदानाचा अनुकूल व प्रतिकुल एकत्रित रिपोर्ट मा. चेअरमन अथवा मा. मॅनेजिंग डायरेक्टर यांना देतील.

५. असाधारण सभा संपल्यावर कंपनीच्या www.saswadmalisugar.in या वेबसाईटवर स्क्रुटीनायझरच्या रिपोर्टसह ७ दिवसात रिझल्ट अपलोड केला जाईल.

मराठी रूपांतर

CDSL च्या ई मतदान (e-voting) सिस्टीमबाबत व सभेत भाग घेण्याबाबतच्या सूचना पुढीलप्रमाणे -

१. मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स यांच्या दि. ५ मे २०२०, ८ डिसेंबर २०२१, १४ डिसेंबर २०२१ चे तसेच मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्सच्या दि. ५ मे २०२२,२८ डिसेंबर २०२२, २५ सप्टेंबर २०२३ आणि १९ सप्टेंबर २०२४ व २२ सप्टेंबर २०२५ च्या (एकत्रितपणे **"MCA"** सर्क्युलर संदर्भित) सर्क्युलर नुसार कंपन्यांना पुढील आदेशापर्यंत त्यांच्या **AGM/EGM** सभा व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे **(VC)** अथवा अदर ऑडीओ व्हीज्युअल मिन्स **(OAVM)** ने, भागधारकांनी समक्ष हजर न राहता घेण्यास मंजूरी दिली आहे. त्यानुसार भागधारक व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे (VC) अथवा अदर ऑडीओ व्हीज्युअल मिन्सने (OAVM) ने जनरल मिटींगमध्ये भाग घेऊ शकतात.

२. कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०८ व कंपनीज (मॅनेजमेंट अॅन्ड अॅडमिनिस्ट्रेशन) रूल्स २०१४ च्या नियम २० नुसार आणि सेक्युरिटीज अॅन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (SEBI) च्या (लिस्टींग ऑब्लिगेशन्स अॅन्ड डिसक्लोजर रिक्वायरमेंट्स) च्या नियम ४४ अन्वये व मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्सच्या दि. ८ एप्रिल २०२०, १३ एप्रिल २०२० व ५ मे २०२० च्या सर्क्युलरनुसार व दि. ५ मे २०२२ च्या पत्रानुसार असाधारण सभेच्या नोटीसीतील विषयांसाठी रिमोट ई-व्होटींगची सुविधा भागधारकांना देण्यात येत आहे. यासाठी Central Depository Services Ltd. (CDSL) अधिकृत इ-व्होटींग एजन्सी राहील. असाधारण मिटींगसाठी रिमोट इ-व्होटींग व इ-व्होटींग सुविधा CDSL पुरविणार आहे.

३. नोटीसमध्ये नमूद केलेल्या सूचनेप्रमाणे व्हीडीओ कॉन्फरन्सिंग (VC) किंवा अदर ऑडीओ व्हीज्युअल मिन्स (OAVM) ने मिटींग सुरू होण्याच्या वेळेपूर्वी ३० मिनिटे अगोदर व नंतर भागधारक सभेत सहभागी होऊ शकतील. VC/OAVM ची सुविधा साधारणपणे १००० भागधारकांसाठी उपलब्ध राहील. यामध्ये प्रमोटर्स, संचालक, ऑडीटर्स, ऑडीट कमिटी, नॉमिनेशन रेम्युनरेशन कमिटी, स्टेक होल्डर्स रिलेशनशिप कमिटी यांचा समावेश नसेल.

४. कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०३ अन्वये जे भागधारक सभेस व्हीडीओ कॉन्फरन्सिंग (VC) किंवा अदर ऑडीओ व्हीज्युअल मिन्स (OAVM) द्वारे हजर राहतील त्यांची कोरमसाठी गणना केली जाईल.

५. मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्सच्या सर्क्युलर नं. १४/२०२० दि. ८ एप्रिल २०२० च्या सर्क्युलरनुसार असाधारण मिटींगसाठी प्रॉक्झी नेमण्याची सुविधा देण्यात येणार नाही.

६. मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्सच्या सर्क्युलर नं. १७/२०२० दि. १३ एप्रिल २०२० च्या सर्क्युलरनुसार असाधारण सभेची नोटीस कंपनीची वेबसाईट http://www.saswadmalisugar.in वर अपलोड केली आहे. तसेच सदरची नोटीस CDSLच्या www.evotingindia.com या वेबसाईटवर उपलब्ध राहील.

७. कंपनी कायदा २०१३ च्या तरतूदीनुसार व वर नमूद सर्क्युलरनुसार सदरची सभा व्हीडीओ कॉन्फरन्सिंग (VC) किंवा अदर ऑडीओ व्हीज्युअल मिन्स (OAVM) ने आयोजित केली आहे.

८. जनरल सर्क्युलर नं. २०/२०२० दि. ५/५/२०२० मधील पॅरा नं. ३ व पॅरा ४ नुसार असलेल्या तरतूदीप्रमाणे MCA ने त्यांचे सर्क्युलर नं. ३/२०२५ दि. २२ सप्टेंबर २०२५ नुसार कंपन्यांना त्यांच्या **AGM/EGM** सभा VC/OAVM ने पुढील आदेशापर्यंत घेण्यास परवानगी दिली आहे.



Scanned with OKEN Scanner

**इ-व्होटींग आणि व्हीडीओ कॉन्फरन्सिंग (VC) किंवा अदर ऑडीओ व्हीज्युअल मिन्स (OAVM) ने असाधारण सभेस उपस्थित राहण्यासाठीच्या सूचना पुढीलप्रमाणे -**

स्टेप नं. १. ज्या भागधारकांचे वैयक्तिक डीमॅट शेअर्स आहेत त्यांना त्यांचे डिपॉझीटरीज CDSL / NSDL यांच्या इ-व्होटींग सिस्टीमधून भाग घेता येईल.

स्टेप नं. २. ज्या भागधारकांचे फिजीकल स्वरूपात शेअर्स आहेत त्यांना CDSL च्या इ-व्होटींग सिस्टीममधून भाग घेता येईल.

i. रिमोट ई -मतदान रविवार दि. ३१ मे २०२६ रोजी सकाळी ९ वाजता सुरु होऊन मंगळवार दि. २ जून २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता बंद होईल. जे भागधारक दि. २६ मे २०२६ रोजी शेअर्स धारण करीत असतील त्यांना रिमोट इ-व्होटींगने मतदान करता येईल. इ-व्होटींगची मुदत संपल्यानंतर CDSL रिमोट ई-मतदानाचे मोड्युल बंद करेल.

ii. ज्या भागधारकांनी सभा सुरू होण्यापूर्वी मतदान केले असेल अशा भागधारकांना मिटींगच्या दिवशी मतदान करता येणार नाही.

iii. SEBI च्या दि. ९.१२.२०२० रोजीच्या सर्क्यूलर नं. SEBI/HO/CFD/CMD/CIR/P/2020/242 नुसार SEBI च्या रेग्युलेशन्स २०१५ च्या रेग्युलेशन नं. ४४ अन्वये भागधारकांना ठरावांवर मतदान करण्यासाठी रिमोट ई-व्होटींगची सुविधा देणे बंधनकारक आहे. असे नजरेस आले आहे की, कमी शेअर्स असलेले व नॉन इन्स्टीट्युशनल भागधारक कमी प्रमाणात मतदान करतात.

सध्या इ-व्होटींग फॅसिलिटीची सुविधा देणाऱ्या अनेक मल्टीपल इ-व्होटींग सर्व्हीस प्रोव्हायडर्स (ESPs) आहेत. यासाठी वेगवेगळ्या (ESPs) वर रजिस्ट्रेशन करावे लागते व मल्टीपल युजर आयडी व पासवर्ड भागधारकांना ठेवावे लागतात.

यासाठी व्होटींग वाढविण्यासाठी डीमॅट भागधारकांना त्यांच्या डीमॅट अकौंट/डिपॉझीटरीच्या वेबसाईटवर एकाच लॉग इन क्रेडेन्शिअलने इ-व्होटींग करता येईल. डीमॅट भागधारकांसाठी (ESPs) कडे रजिस्टर न करता सुरळीतपणे व्होटींग प्रोसेसमध्ये सामील होता येईल.

स्टेप नं. १. ज्या भागधारकांचे वैयक्तिक डीमॅट शेअर्स आहेत त्यांना त्यांचे डिपॉझीटरीज CDSL/NSDL यांच्या इ-व्होटींग सिस्टीममधून भाग घेता येईल.

iv. SEBI च्या दि. ९.१२.२०२० रोजीच्या सर्क्युलर नं. SEBI/HO/CFD/CMD/CIR/P/2020/242 नुसार ज्या भागधारकांचे डीमॅट शेअर्स आहेत त्यांना ज्या डिपॉझीटरीकडे व डिपॉझीटरी पार्टीसिपंटकडे खाते आहे त्यांच्या मार्फत मतदान करता येईल. भागधारकांना इ-व्होटींग फॅसिलिटीचा वापर करण्यासाठी त्यांच्या डीमॅट अकौंटचे मोबाईल नंबर व इ-मेल आयडी त्यांचेकडे अद्ययावत करणे आवश्यक आहे.

SEBI च्या वर नमूद सर्क्युलरनुसार ज्या भागधारकांचे डीमॅट शेअर्स CDSL/NSDL यांचेकडे आहेत त्यांना इ-व्होटींग व व्हर्च्युअल मिटींगला हजर राहणेसाठी व लॉग इन करण्यासाठी पुढील पध्दतीचा वापर करावा.

| भागधारकांचा प्रकार | लॉग इन करावयाची पध्दत |
|---|---|
| ज्यांचे डीमॅट शेअर्स **CDSL** कडे आहेत त्यांच्यासाठी | १. ज्या भागधारकांनी CDSL Easi/Easiest facility पर्याय निवडला आहे त्यांना त्यांच्या सध्याच्या युजर आयडी व पासवर्डमधून लॉग इन करता येईल. त्यामुळे इ-व्होटींगच्या पेजवर कोणतेही प्रमाणिकरण (authentication) न करता जाता येईल. ज्यांना Easi/Easiest facility मधून लॉग इन करावयाचे आहे त्यांच्यासाठी URL पुढीलप्रमाणे राहील. **https://web.cdslindia.com/myeasi/home/login** किंवा **www.cdslindia.com** या वेबसाईटवर जाऊन लॉग इन आयकॉनवर क्लीक करून नवीन Myeasi system निवडावी.<br>२. यानंतर Easi/Easiest यावर लॉग इन झाल्यावर इ-व्होटींगचा पर्याय दिसेल व त्यामध्ये ज्या कंपन्यांचे इ-व्होटींग सुरू आहे त्याची माहिती दिसेल. इ-व्होटींग सर्व्हीस प्रोव्हायडरच्या पानावरील रिमोट इ-व्होटींग करण्यासाठीचा पर्याय दिसेल व तसेच व्हर्च्युअल मिटींगला हजर राहण्याबाबत व मिटींगच्या वेळेस मतदानाचा पर्याय दिसेल. यासोबतच सर्व इ-व्होटींग सर्व्हीस प्रोव्हायडरच्या उदा. CDSL/NSDL/ MUFG Intime यांच्या लिंक्स उपलब्ध असून भागधारक इ-व्होटींग सर्व्हीस प्रोव्हायडरच्या वेबसाईटची निवड करू शकतील.<br>३. ज्या भागधारकांनी Easi/Easiest पर्यायासाठी रजिस्ट्रेशन केले नसेल त्यांना **https://web.cdslindia.com/myeasi/Registration/EasiRgistration** या लिंकवर रजिस्ट्रेशन करण्याचा पर्याय राहील.<br>४. भागधारकांना www.cdslindia.com यावर उपलब्ध असलेले इ-व्होटींग लिंकवर जाऊन डीमॅट अकौंट नंबर, पॅन नंबर नमूद करून इ-व्होटींग पेजवर जाता येईल किंवा **https://evoting.cdslindia.com/Evoting/Evoting/Login** यावर क्लीक करावे. यानंतर भागधारकांना प्रमाणीत (authenticate) करून त्यांच्या रजिस्टर मोबाईल व इ-मेल आयडीवर ओटीपी पाठविला जाईल. यानंतर भागधारक प्रमाणीत झाल्यावर त्यांना इ-व्होटींगचा पर्याय दिसेल व इ-व्होटींग सिस्टीममध्ये जाता येईल. |



Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| ज्यांचे डीमॅट शेअर्स NSDL कडे आहेत त्यांच्यासाठी | १. आपण जर NSDL IDeAS सुविधेसाठी रजिस्ट्रेशन केलेले असल्यास आपण NSDL च्या इ-सर्व्हीसेस वेबसाईट उघडावी. याराठी वेब ब्राऊजर उघडण्यासाठी पुढील URL टाईप करावे. **https://eservices.nsdl.com** हे इ-सर्व्हीसेसची वेबसाईट उघडल्यावर **IDeAS** सेक्शनमधील लॉग इनवर जाऊन बेनिफिशिअल ओनर यावर क्लीक करावे. यानंतर नवीन स्क्रीन उघडला जाईल. त्यामध्ये तुमचा युजर आयडी व पासवर्ड टाकावा लागेल. याबाबतचे ऑथिंटिकेशन झाल्यावर इ-व्होटींग सर्व्हीसेस आपल्याला बघता येईल. या इ-व्होटींग सर्व्हीसेसच्या "access to evoting" यावर क्लीक करावे.<br>यानंतर इ-व्होटींगचे पान आपल्याला दिसेल. त्यानंतर इ-व्होटींग सर्व्हीस प्रोव्हायडर वेबसाईटवर जाण्यासाठी कंपनीच्या नावावर अथवा इ-व्होटींग सर्व्हीसेस प्रोव्हायडरच्या नावावर क्लीक करावे व त्यानंतर सदर वेबसाईटवर आपले रिमोट मतदान नोंदवावे किंवा व्हर्च्युअल मिटींगसाठी हजर राहण्यासाठी व मिटींगमध्ये मतदान करण्यासाठी त्याचा उपयोग करावा.<br>२. ज्या भागधारकांनी IDeAS इ-सर्व्हीसेस पर्यायासाठी रजिस्ट्रेशन केले नसल्यास त्यांना **https://eservices.nsdl.com** या लिंकवर रजिस्ट्रेशन करण्याचा पर्याय उपलब्ध राहील. यानंतर रजिस्टर ऑनलाईन फॉर IDeAS पोर्टल निवडावे किंवा https://eservices.nsdl.com/SecureWeb/IdeasDirectReg.jsp यावर क्लीक करावे.<br>३. NSDL च्या इ-व्होटींग वेबसाईटवर जावे. पुढे नमूद URL **https://www.evoting.nsdl.com** टाईप करून वेब ब्राऊजर उघडावा. यामध्ये "shareholder/member" येथे जाऊन लॉग इन आयकॉनवर क्लीक करावे. यानंतर नवीन स्क्रीन उघडेल. या स्क्रीनवर तुमचा युजर आयडी (NSDL चा तुमचा १६ अंकी डीमॅट अकौंट नंबर), पासवर्ड/ओटीपी आणि स्क्रीनवर दाखविलेला व्हेरीफिकेशन कोड नमूद करावा. याबाबतचे ऑथिंटेकेशन झाल्यावर NSDL डिपॉझीटरीच्या साईटवर आपणास इ-व्होटींगचे पान दिसेल. त्यामध्ये कंपनीच्या नावावर किंवा इ-व्होटींग सर्व्हीसेस प्रोव्हायडरच्या नावावर क्लीक करावे व त्यानंतर इ-व्होटींग सर्व्हीसेस प्रोव्हायडरच्या वेबसाईटवर रिमोट इ-व्होटींग किंवा व्हर्च्युअल मिटींगसाठी हजर राहण्यासाठी व मिटींगमध्ये मतदान करण्यासाठी त्याचा उपयोग करावा. |
| वैयक्तिक डिमॅट भागधारकांच्या डिपॉझीटरी पार्टीसिपंटसच्या माध्यमातून लॉग इन बाबत | आपण लॉग इन केल्यावर आपणास इ-व्होटींग पर्याय दिसेल. या इ-व्होटींग पर्यायावर क्लीक केल्यावर आपणास NSDL/CDSL डिपॉझीटरी साईटवर जाता येईल. त्यानंतर ऑथेंटीकेशन झाल्यावर तुम्हांस इ-व्होटींग पर्याय दिसेल. त्यामध्ये कंपनीचे नांव किंवा इ-व्होटींग सर्व्हीस प्रोव्हायडरचे नांव आणि तुम्हांस तुमचे रिमोट इ-व्होटींग किंवा व्हर्च्युअल मिटींगसाठी हजर राहण्यासाठी व मिटींगमध्ये मतदान करण्यासाठी त्याचा उपयोग करावा. |

महत्वाची टीप- ज्या भागधारकांना त्यांचे युजरआयडी/पासवर्ड पुनर्रप्राप्त (retrieve) करता येत नाहीत त्यांनी forget user id and forget password वेबसाईटवर उपलब्ध असणाऱ्या पर्यायाचा वापर करावा.

ज्या भागधारकांचे शेअर्स डीमॅट स्वरूपात आहेत व त्याबाबत CDSL आणि NSDL कडे लॉग इन करण्यास टेक्निकल अडचणी येत असल्यास त्यांच्या साठी पुढीलप्रमाणे माहिती आहे.

| लॉग इनचा प्रकार | हेल्प डेस्क डिटेल्स |
|---|---|
| **CDSL कडे डिमॅट शेअर्स असणाऱ्या भागधारकांसाठी** | ज्या भागधारकांना लॉग इन करण्यासाठी टेक्निकल अडचणी येत असतील त्यांनी CDSL च्या help desk **helpdesk.evoting@cdslindia.com** कडे त्यांची रिक्वेस्ट पाठवावी अथवा टोल फ्री नं. १८०० २१० ९९ ११ या नंबरवर संपर्क साधावा. |
| **NSDL कडे डिमॅट शेअर्स असणाऱ्या भागधारकांसाठी** | ज्या भागधारकांना लॉग इन करण्यासाठी टेक्निकल अडचणी येत असतील त्यांनी NSDL च्या help desk **evoting@nsdl.co.in** कडे त्यांची रिक्वेस्ट पाठवावी अथवा ०२२ ४८ ८६ ७००० व ०२२ २४ ९९ ७००० टोल फ्री नंबरवर संपर्क साधावा. |

**स्टेप नं. २** ज्या भागधारकांचे फिजीकल स्वरूपात शेअर्स आहेत त्यांना **CDSL** च्या इ-व्होटींग सिस्टीममधून भाग घेता येईल.

v. जे भागधारक फिजीकल स्वरूपात शेअर्स धारण करीत आहेत त्यांचेसाठी इ-व्होटींग व व्हर्च्युअल मिटींगसाठी हजर राहण्याबाबतची लॉग इन पध्दत पुढीलप्रमाणे-

१. भागधारकांनी **www.evotingindia.com** यासंकेत स्थळावर ई-व्होटींगसाठी लॉग इन करावयाचे आहे.

२. भागधारक (shareholders) यावर क्लीक करावे.

३. आता इलेक्ट्रॉनिक व्होटींग बाबतच्या तपशीलामध्ये नमूद केलेला सिक्वेन्स नंबर नमूद करा.

अ. CDSL साठी १६ अंकी beneficiary ID

आ NSDL साठी ८ अंकी DP ID आणि त्या पाठोपाठ ८ अंकी Client ID



Scanned with OKEN Scanner

३. जे भागधारक फिजीकल स्वरूपात शेअर्स धारण करीत आहेत त्यांनी कंपनीकडील रजिस्टर्ड फोलिओ नंबर नमूद करावा.

४. त्यानंतर image verification नमूद करावे व login वर क्लीक करावे.

५. जर तुम्ही इतर लिस्टेड कंपन्यांमध्ये डीमॅट स्वरूपात शेअर्स धारण करीत असाल आणि संकेत स्थळ www.evotingindia.com यावर login केले असेल आणि कोणत्याही कंपनीचे मतदान याआधी केलेले असेल तर तुमचा त्यावेळचा पासवर्ड वापरावयाचा आहे.

६. जर तुम्ही प्रथमच या पध्दतीचा वापर करीत असाल तर पुढे दिलेल्या क्रमाने कृती करा.

| | फिजीकल स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या भागधारकांसाठी आणि जे वैयक्तिक स्वरूपात डीमॅट शेअर्स धारण करीत नाहीत त्यांच्यासाठी |
|---|---|
| पॅन PAN | आयकर खात्याने तुम्हाला दिलेला तुमचा १० अंकी अल्फा-न्युमेरिक पॅन (PAN) नंबर नमूद करा. (डीमॅट आणि फिजिकल अशा दोन्ही प्रकारच्या भागधारकांसाठी)<br>• ज्या भागधारकांनी आपला पॅन नंबर कंपनीकडे/डिपॉझिटरीकडे नोंदविलेला नाही त्यांनी इलेक्ट्रॉनिक व्होटींग तपशीलामधील सिक्वेन्स नंबर वापरावयाचा आहे. |
| डिव्हीडंड बँक डिटेल्स किंवा जन्मतारीख | लॉग इन करण्यासाठी तुमच्या डीमॅट खात्यामध्ये किंवा कंपनीच्या रेकॉर्डमध्ये तुम्ही नोंदविलेल्या बँक खात्याचा तपशील किंवा जन्मतारीख (dd / mm / yyyy) या स्वरूपात नमूद करावी.<br>• बँक खात्याचा अथवा जन्मतारखेचा तपशील कंपनीकडे अथवा डिपॉझीटरीकडे नोंदविलेला नसल्यास डीव्हीडंड बँक डिटेल्समध्ये मेंबर आयडी/फोलिओ नंबर नमूद करावा. |

vi. हा तपशील योग्य रितीने भरल्यानंतर, submit वर क्लिक करा.

vii. जे भागधारक फिजिकल स्वरूपात शेअर्स धारण करीत आहेत ते थेट कंपनी निवडीच्या स्क्रीनवर पोहोचतील. तथापि,जे भागधारक इतर लिस्टेड कंपनीचे डीमॅट स्वरूपात शेअर्स धारण करतात ते आता पासवर्ड निर्मितीच्या मेनूवर जाऊन पोहोचतील, जेथे त्यांना त्यांचा login password नवीन पासवर्डच्या रकान्यात भरणे अनिवार्य आहे. हाच पासवर्ड डीमॅट खातेधारकांनी, ते जेथे मतदानास पात्र असतील अशा दुसऱ्या कुठल्या कंपनीच्या ठरावाला मत देण्यासाठी वापरावयाचा आहे व त्यासाठी CDSL चे माध्यम मतदानासाठी निवडले असले पाहिजे. आपणास सुचित करण्यात येत आहे की, तुम्ही दुसऱ्या कोणालाही आपल्या पासवर्डची माहिती देवू नये आणि तुमचा पासवर्ड गुप्त ठेवा.

viii. फिजिकल स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या भागधारकांना त्यांचा तपशील फक्त या नोटीसीमध्ये नमूद केलेल्या ठरावांवरील मतदानासाठीच वापरला जाऊ शकतो.

ix. आता दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. च्या ड्रॉप डाऊन मेनूमधून इलेक्ट्रॉनिक व्होटींग सिक्वेन्स नंबर (EVSN) निवडा व submit वर क्लिक करा.

x. मतदानाच्या पानावर ठरावाचे वर्णन आणि त्याच्या समोरच्या बाजूस मत देण्यासाठी हो/नाही हे पर्याय दिसतील. तुमच्या इच्छेनुसार हो किंवा नाही चा पर्याय निवडा. " हो " हा पर्याय तुमची ठरावास मान्यता आहे असे दर्शवितो तर " नाही " हा पर्याय तुमची ठरावास मान्यता नाही असे दर्शवितो.

xi. जर तुम्हाला ठरावाचा संपूर्ण तपशील पहावयाचा असेल तर ठराव फाईल लिंक वर क्लीक करा.

xii. ज्या ठरावावर मत देण्याचे तुम्ही ठरविले असेल तेथे submit वर क्लिक करा. एक कन्फर्मेशन बॉक्स समोर येईल. जर मत देण्याची इच्छा असेल तर ok वर क्लिक करा. जर तुमचे मत बदलायचे असेल तर cancel वर क्लिक करा आणि त्यानुसार तुमचे सुधारीत मत नोंदवा.

xiii. एकदा तुम्ही तुमचे ठरावावरील मत निश्चित (confirm) केले की तुम्हाला तुमचे मत बदलण्याची मुभा राहणार नाही.

xiv. मतदानाच्या पानावरील "click here to print" या पर्यायावर क्लिक करून तुम्ही केलेल्या मतदानाची छापील प्रत तुम्ही घेऊ शकता.

xv. जर डीमॅट अकौंट होल्डर पासवर्ड विसरला असल्यास तर त्यांनी त्यांचा युजर आयडी व इमेज व्हेरीफिकेशन कोड नमूद करावा व forgot password यावर क्लीक करावे व सिस्टीम जसे सांगेल त्याप्रमाणे माहिती भरत जावी.

जे भागधारक व्हीडीओ कॉन्फरन्सिंग (VC) किंवा अदर व्हीज्युअल मिन्स (OAVM) ने असाधारण सभेस हजर असणाऱ्या भागधारकांसाठी सभेच्या वेळी इ-व्होटींग करण्याबाबतच्या सूचना-

१. रिमोट इ-व्होटींग प्रमाणेच सभेच्या दिवशी इ-व्होटींग करण्याची पध्दत राहील.

२. वर नमूद इ-व्होटींगच्या सूचनेप्रमाणे लॉग इन केल्यावर व्हीडीओ कॉन्फरन्सिंग (VC) किंवा अदर ऑडीओ व्हीज्युअल मिन्स (OAVM) ची लिंक मिटींगसाठी हजर राहण्यासाठी उपलब्ध होईल व त्यामध्ये लॉग इन केल्यावर कंपनीचा EVSN दिसेल.

३. ज्या भागधारकांनी रिमोट इ-व्होटींगने मतदान केले आहे त्यांना सदर सभेस हजर राहता येईल. परंतु त्यांना इ-व्होटींग सिस्टीमने सभेत मतदान करता येणार नाही.

४. भागधारकांनी त्यांच्या लॅपटॉप/आयपॅडचा उपयोग करून सभेस व्हीडीओ कॉन्फरन्सिंग (VC) किंवा अदर ऑडीओ व्हीज्युअल मिन्स (OAVM) ने सहभागी व्हावे.

५. मिटींगच्या वेळेस चांगला स्पीड असलेले इंटरनेट कनेक्शन व कॅमेरा असणे गरजेचे आहे की ज्यामुळे मिटींगच्या वेळी अडथळा येणार नाही.



Scanned with OKEN Scanner

६. लॅपटॉप/आयपॅडचा/मोबाईल या द्वारे भाग घेताना भागधारकांना नेटवर्कमध्ये ऑडीओ/व्हीडीओचा कनेक्शनचा प्रॉब्लेम येऊ शकतो त्यासाठी स्टेबल, वायफाय कनेक्शनचा उपयोग करावा.

७. ज्या भागधारकांना सभेच्या वेळी प्रश्न विचारावयाचे आहेत व बोलावयाचे आहे त्यांनी किमान तीन दिवस आधी त्यांचे नाव, डीमॅट अकौंट/फोलीओ नंबर, इमेल आयडी, मोबाईल नंबर कंपनीच्या saswadmali@yahoo.com या इमेलवर पाठवावा. जे भागधारक सभेच्या वेळी बोलू इच्छित नाहीत त्यांनी नोटीसीतील विषया संदर्भात प्रश्न असल्यास ते प्रश्न मिटींगपूर्वी १५ दिवस अगोदर त्यांचे नाव, डीमॅट अकौंट/फोलीओ नंबर, इमेल आयडी, मोबाईल नंबर देऊन कंपनीच्या saswadmali@yahoo.com या इमेलवर पाठवावेत.

८. जे भागधारक सभेच्या वेळी बोलू इच्छितात व ज्यांनी रजिस्ट्रेशन केले आहे त्यांनाच सभेच्या वेळी त्यांचे विचार मांडता येतील. परंतु ज्या भागधारकांनी रजिस्ट्रेशन केले नाही अशा भागधारकांना बोलू द्यायचे की नाही याचा निर्णय मा. चेअरमन घेतील.

९. जे भागधारक व्हीडीओ कॉन्फरन्सिंग (VC) किंवा अदर ऑडीओ व्हीज्युअल मिन्स (OAVM) ने सभेस हजर आहेत व ज्यांनी ठरावांवर रिमोट इ-व्होटींग ने मतदान केले नाही त्यांना सभेच्या वेळी इ-व्होटींग सिस्टीम द्वारे मतदान करता येईल.

१०. ज्या भागधारकांनी व्हीडीओ कॉन्फरन्सिंग (VC) किंवा अदर ऑडीओ व्हीज्युअल मिन्स (OAVM) ने सभेस हजर न राहता इ-व्होटींगने मतदान केल्यास ते मतदान अवैध मानले जाईल. कारण इ-व्होटींगची सुविधा जे भागधारक VC/OAVM ने सभेस हजर आहेत त्यांनाच उपलब्ध आहे.

**ज्या भागधारकांचे इ-मेल/मोबाईल नंबर कंपनी अथवा डिपॉझीटरीजकडे रजिस्टर केलेले नाहीत त्याबाबत-**

१) जे भागधारक फिजीकल स्वरूपात शेअर्स धारण करीत आहेत त्यांनी त्यांचे फोलिओ नंबर, नांव, सेल्फ अटेस्टेड पॅन, आधार, मोबाईल, इ-मेल कंपनीच्या इ-मेलवर पाठवून अद्ययावत करावेत.

२) जे भागधारक डीमॅट स्वरूपात शेअर्स धारण करीत आहेत त्यांनी त्यांचे इ-मेल आयडी व मोबाईल नंबर डिपॉझीटरी पार्टीसिपंटकडे अद्ययावत करावेत. कारण इ-व्होटींग व सभेस हजर राहण्यासाठी हे गरजेचे आहे.

३) वैयक्तीक डीमॅट भागधारक आहेत त्यांनी कृपया त्यांचा इ-मेल आयडी आणि मोबाईल नंबर त्यांच्या डिपॉझीटरी पार्टीसिपंटकडे (DP) कडे अद्ययावत करावा. इ-व्होटींग व सभेस हजर रहाणेसाठी हे गरजेचे आहे.

असाधारण सभेत हजर राहण्याबाबत व इ-व्होटींग बाबत काही शंका असल्यास तुम्ही helpdesk.evoting@cdslindia.com किंवा टोल फ्री नं. १८०० २१० ९९ ११ यावर संपर्क करू शकता.

इ-व्होटींगबाबत ज्या काही शंका आहेत त्यासाठी श्री. राकेश दळवी, सिनिअर मॅनेजर (CDSL) सेंट्रल डिपॉझीटरी सर्व्हीसेस (इंडिया) लि; ए विंग, २५ वा मजला, मॅरॅथॉन फ्युचरेक्स, मफतलाल मिल कंपाऊंड, एन. एम. जोशी मार्ग, लोअर परेल (ईस्ट), मुंबई - ४०० ०१३ यांचेशी संपर्क साधावा किंवा टोल फ्री क्रमांक १८०० २१० ९९ ११ वर फोन करावा.

मा. संचालक मंडळाच्या आदेशानुसार
राजेंद्र गो. गिरमे
चेअरमन
(DIN: 00431247)
अकलूज-माळीनगर रोड, २१ चारी, माळीनगर
ता. माळशिरस, जि. सोलापूर ४१३१०८

माळीनगर
७ मे २०२६

---

**असाधारण सभेच्या स्पेशल बिझीनेसबाबत कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०२ अन्वये खुलासेवार निवेदन पुढीलप्रामणेः-**

**नोटीसीतील विषय नं. १ आकस्मिक रिक्त जागा भरणेसाठी स्टॅट्युटरी ऑडीटरच्या नेमणूकी बाबत.**

कंपनीचे मागील स्टॅट्युटरी ऑडीटर मे. शारपार्थ आणि कंपनी एलएलपी चार्टर्ड अकौंटंट्स, पुणे (FRN 132748 W) यांनी व्यस्ततेमुळे १० मार्च २०२६ पासून कंपनीच्या स्टॅट्युटरी ऑडीटरचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे एक नैमित्तिक रिक्त जागा झाली आहे.

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३९ (८) च्या तरतुदीनुसार, राजीनाम्यामुळे निर्माण झालेली आकस्मिक रिक्त जागा कंपनीच्या भागधारकांच्या साधारण सभेत भरण्यासाठी संमतीची आवश्यकता आहे.

संचालक मंडळाने २० मार्च २०२६ रोजी झालेल्या सभेत कंपनीतील आकस्मिक रिक्त जागा भरण्यासाठी मे. एल. एम. जोशी आणि कंपनी चार्टर्ड अकौंटंट्स, पुणे (FRN 104403 W) यांची कंपनीचे स्टॅट्युटरी ऑडीटर म्हणून नेमणूक करण्याची शिफारस केली आहे. कंपनीला मे. एल. एम. जोशी आणि कंपनी यांच्याकडून स्टॅट्युटरी ऑडीटर म्हणून काम करण्यासाठी संमती मिळाली आहे आणि याची पुष्टी करणारे प्रमाणपत्रही मिळाले आहे. त्यांची नेमणूक झाल्यास ती कंपनी कायदा २०१३ च्या लागू तरतुदीनुसार असेल.

सदर ठराव कंपनीच्या हितासाठी संचालक मंडळ आपल्या मान्यतेसाठी शिफारस करीत आहे.

हा ठराव मंजुर करण्यात कोणत्याही संचालकांचा वैयक्तिक हितसंबंध नाही.

**नोटीसीतील विषय नं. २ आणि ३ बॉरोईंग व चार्जबाबत.**

कंपनी कायदा, १९५६ च्या कलम २९३ (१) (अ) आणि (१) (ड) च्या तरतुदीस अनुसरून भागधारकांनी दि. २९.५.२०१२ रोजी भरलेल्या असाधारण सभेत ठराव मंजूर केल्यानंतर कंपनीच्या संचालक मंडळास रूपये १२५ कोटीपर्यंत कर्ज (कंपनीच्या नेहमीच्या कामकाजाकरिता कंपनीने बँकर्सकडून तात्पुरती कर्जे घेतली असतील तर ती सोडून) घेण्याचा अधिकार दिला होता.



Scanned with OKEN Scanner

कंपनी कायदा २०१३ लागू झाल्यामुळे संचालक मंडळाच्या कर्ज घेण्याच्या अधिकार संबंधीच्या तरतुदी आता कलम १८०(१)(सी) आणि बोजा निर्माण करणे कलम १८०(१)(अ) व कलम ७७ द्वारे नियंत्रित केले जातात. ज्यासाठी खास ठरावाद्वारे भागधारकांची मंजूरी आवश्यक आहे. त्यानुसार पुर्वीची मंजूरी कंपनी कायदा २०१३ च्या तरतुदींशी सुसंगत करणे आवश्यक आहे.

कंपनी साखर उत्पादनाच्या उद्योगात कार्यरत असून जो मुळातच हंगामी आणि खेळत्या भांडवलाची मोठी गरज असलेला उद्योग आहे. कंपनीच्या कामकाजासाठी गाळप हंगामात ऊस खरेदी, शेतकऱ्यांना वेळेवर पैसे देणे, कर्मचाऱ्यांचे पगार, वाहतूक आणि इतर दैनंदिन खर्चासाठी मोठ्या निधीची आवश्यकता असते.

सध्याच्या परिस्थितीत साखर उद्योगाला वाढत्या खर्चाच्या दबावाचा सामना करावा लागत आहे. ज्यामध्ये ऊसाचा वाढलेला वाजवी दर आणि किफायतशिर दर (एफआरपी), वाढता उत्पादन खर्च आणि देखभाल खर्च, तसेच मिळणाऱ्या उत्पन्नावर परिणाम करणारी साखरेच्या दरातील अस्थिरता यांचा समावेश आहे. याशिवाय अनियमित पाऊस, दुष्काळ किंवा अतिवृष्टी यासारख्या प्रतिकूल कृषी हवामान परिस्थितीचाही या उद्योगावर परिणाम होत आहे. ज्यामुळे ऊसाची उपलब्धता आणि रिकव्हरीवर परिणाम होतो आणि परिणामी कंपनीच्या एकूण उत्पादनावर आणि कॅशफ्लोवर परिणाम होतो. कंपनीला नियामक आवश्यकतानुसार शेतकऱ्यांना वेळेवर ऊसाचे पैसे देणे देखील आवश्यक आहे. ज्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध असणे गरजेचे आहे.

या व्यतिरिक्त कंपनी इथेनॉल उत्पादन आणि इतर संबंधित उपक्रमही करीत आहे. ज्यामुळे मिळकतीचे विविधीकरण होते आणि एकूण परिचालन कार्यक्षमता व कॅशफ्लोमध्ये सुधारणा होते. कंपनीला विद्यमान सुविधांच्या आधुनिकीकरण आणि गुणवत्ता अद्ययावत करण्यासाठी खर्च करावा लागू शकतो. जो दीर्घकालीन शाश्वततेसाठी आवश्यक आहे.

वरील बाबी आणि कामकाजाची वाढलेली व्याप्ती लक्षात घेता कंपनीच्या सध्याच्या आणि पुढील आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी सध्याची कर्ज मर्यादा अपुरी आहे. त्यानुसार कंपनीच्या नेहमीच्या कामकाजाकरिता कंपनीने बँकांकडून तात्पुरत्या स्वरूपाची कर्जे घेतली असतील तर ती सोडून संचालक मंडळाचे कर्ज घेण्याचे अधिकार रू. १६० कोटी (रूपये एकशे साठ कोटी फक्त) पर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव आहे.

या वाढीव कर्ज मर्यादेमुळे कंपनीला तिच्या खेळत्या भांडवालाच्या गरजा कार्यक्षमतेने भागविण्यासाठी आणि व्यवसायाच्या वाढीच्या योजनांना पाठिंबा देण्यासाठी आवश्यक आर्थिक पाठबळ मिळेल.

सदर ठराव कंपनीच्या हितासाठी संचालक मंडळ आपल्या मान्यतेसाठी शिफारस करीत आहे.

हा ठराव मंजुर करण्यात कोणत्याही संचालकांचा वैयक्तिक हितसंबंध नाही.

**नोटीसीतील विषय नं. ४ गॅरंटी देणेबाबत.**

कंपनी कायदा, १९५६ च्या कलम ३७२ अ च्या तरतुदीस अनुसरून भागधारकांनी दि. २८.९.२०११ रोजी भरलेल्या वार्षिक साधारण सभेत मंजुर केलेल्या ठरावानुसार कंपनीच्या संचालक मंडळास रू. १२ कोटी पर्यंत गॅरंटी देण्याचे अधिकार दिले होते.

कंपनी कायदा २०१३ लागू झाल्यामुळे कर्ज, गुंतवणूक, हमी आणि सिक्युरीटीजशी संबंधित तरतूदी आता कायद्याच्या कलम १८६(३) द्वारे नियंत्रित केल्या आहेत. त्यानुसार पूर्वीची मंजूरी एका खास ठरावाद्वारे कंपनी कायदा २०१३ च्या तरतुदीशी सुसंगत करणे आवश्यक आहे.

परंतु कंपनी कायदा २०१३ च्या तरतुदीनुसार गॅरंटी देण्यासाठी खास ठरावाने मंजुरी घेणे बंधनकारक केले आहे.

कंपनी कायदा २०१३ च्या तरतुदीनुसार संचालक मंडळ कंपनीच्या पुर्ण भरपाई झालेल्या शेअर्सच्या व फ्री रिझर्व्हजच्या व सिक्युरिटीज प्रिमियम अकौंटच्या ६०% पेक्षा जास्त किंवा फ्री रिझर्व्हजच्या व सिक्युरिटीज प्रिमियम अकौंटच्या १००% पेक्षा जास्त, गुंतवणूक करु शकते व कर्ज किंवा गॅरंटी देवू शकते. परंतु असे कर्ज, गॅरंटी किंवा गुंतवणूक करण्यासाठी भागधारकांची खास ठरावान्वये मंजुरीची आवश्यकता आहे.

कंपनी साखर उद्योगात कार्यरत असल्यामुळे कंपनीला आपल्या व्यवसायाच्या नेहमीच्या कामकाजासाठी गॅरंटी देणे आवश्यक असते. विशेषता ऊस तोडणी आणि वाहतूक कंत्राटदारांना बँका व वित्तीय संस्थाकडून मिळणाऱ्या कर्जासाठी/ॲडव्हान्सेससाठी गॅरंटी देणे गरजेचे असते. कारण गाळप हंगामात ऊसाची खरेदी सुरळीतपणे होणे आणि वेळेवर होण्यासाठी अशा गॅरंटीज द्याव्या लागतात.

वरील बाबी लक्षात घेता आणि अधिक आर्थिक पाठबळ प्राप्त करण्यासाठी संचालक मंडळाला कर्ज देणे, गुंतवणूक करणे गॅरंटी किंवा सिक्युरिटीज देण्यासाठी अधिकृत करण्याचा प्रस्ताव आहे. ज्याची एकूण रक्कम रूपये १५ कोटी (रूपये पंधरा कोटी) पेक्षा जास्त नसेल.

वाढीव गॅरंटी देण्याच्या अधिकारामुळे कंपनीला व्यवसायिक गरजांची त्वरीत पुर्तता करणे आणि कंपनीचया कामकाजातील गरजा भागविणे शक्य होईल.

सदर ठराव कंपनीच्या हितासाठी संचालक मंडळ आपल्या मान्यतेसाठी शिफारस करीत आहे.

हा ठराव मंजुर करण्यात कोणत्याही संचालकांचा वैयक्तिक हितसंबंध नाही.

माळीनगर
७ मे २०२६

मा. संचालक मंडळाच्या आदेशानुसार
राजेंद्र गो. गिरमे
चेअरमन
(DIN: 00431247)
अकलूज-माळीनगर रोड, २१ चारी, माळीनगर
ता. माळशिरस, जि. सोलापूर ४१३१०८



Scanned with OKEN Scanner